अग्रतश्चतुरो वेदाः पृष्ठतः सशरं धनुः ।
इदं ब्राह्ममिदं क्षात्रं शापादपि शरादपि ।।

# चित्तपावन मित्र




वर्ष ४३ वे

अंक ४ वा

१० एप्रिल २०२२

किंमत १ रूपया


## श्री परशुराम वेद विद्या व श्री परशुराम पुरस्कार २०२२

### सस्नेह निमंत्रण

सप्रेम नमस्कार,

श्री परशुराम जयंती निमित्ताने, सोमवार, दिनांक २ मे २०२२ रोजी, सायं. ५ वा. कालिदास कला मंदिरात 'श्री परशुराम वेद विद्या व श्री परशुराम पुरस्कार सोहळा' संपन्न होणार आहे. तरी आपण सर्वांनी या कार्यक्रमास अवश्य उपस्थित रहावे. ही विनंती. दरवर्षीप्रमाणे या प्रसंगी चारही वेद शाखेतील वेदमूर्तींचा श्री परशुराम वेद विद्या पुरस्कार सोहळा हा कार्यक्रम आयोजित केला आहे.

### * प्रमुख अतिथी *

प्रसिद्ध अभिनेते – **श्री. प्रशांत दामले**

### * पुरस्कारार्थी *

ऋग्वेद :- **वेदमूर्ती श्री मनिष मंदार पटवर्धन**

यजुर्वेद :- **वेदमूर्ती श्री चिंतामणी बाळकृष्ण आंबेकर**

अथर्ववेद :- **वेदमूर्ती श्री विश्वास विलासराव मुळे**

सामवेद :- **वेदमूर्ती श्री अक्षय बाळासाहेब जोशी**

### * आपले स्नेहांकित *

| श्री. विजय साने | ॲड. अविनाश भिडे | श्री. अभय खरे | श्री. श्रीरंग वैशंपायन |
|---|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | कार्यवाह | कोषाध्यक्ष |

### * विश्वस्त मंडळ *

प्रा. दिनकरराव बर्वे, प्रा. दिलीप फडके, डॉ. विजय काकतकर,
डॉ. श्रीकांत केळकर

### * स्वागतोत्सुक *

कार्यकारी मंडळ

चित्तपावन ज्येष्ठ नागरिक मंच
चित्तपावन उद्योजक मंच
चित्तपावन महिला मंडळ
चित्तपावन युवा मंच

टीप :- कार्यक्रमानंतर सभासदांसाठी नाटकाचे आयोजन करण्यात आले आहे.

# श्री. परशुराम वेद विद्या पुरस्कार सोहळा २०२२

## कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी



**श्री. प्रशांत पुरुषोत्तम दामले** (प्रसिद्ध अभिनेते, मुंबई.)

प्रशांत दामले हे मराठी चित्रपट, नाट्य, दूरचित्रवाणी सृष्टीमधले फार मोठे व्यक्तिमत्व आहे. त्यांनी अनेक मराठी चित्रपट, रंगभूमी बरोबरच हिंदी दूरचित्रवाणीच्या मालिकांमध्ये अभिनय केला आहे. तसेच काही कार्यक्रमांचे सूत्र संचालनही केले आहे. त्यांच्या कारकिर्दीला १९८३ पासून सुरुवात झाली. **प्रमुख नाटके –** चार दिवस प्रेमाचे, जादू तेरी नजर, गेला माधव कुणीकडे, **प्रमुख चित्रपट –** वाजवा रे वाजवा, सवत माझी लाडकी, पसंत आहे मुलगी, तू तिथं मी, **प्रमुख टीव्ही कार्यक्रम –** काय पाहिलंस माझ्यात, घरकुल, बे दुणे तीन. **सूत्र संचालन –** आम्ही सारे खवय्ये व सध्या सुरु असलेला ''**किचन कलाकार.**''

**त्यांना लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्स, महाराष्ट्र राज्य पुरस्कार, नाट्यपदर्पण, अखिल भारतीय नाट्य परिषद अशा ३२ हून अधिक पुरस्कारांनी सन्मानित केले आहे.**

## विविध वेदमूर्तींचा परिचय

### १) ऋग्वेद :–



**वेदमूर्ती श्री. मनिष मंदार पटवर्धन, पुणे.**

**अध्ययन :–** वेदमूर्ती कोतवडेकर गुरूजी यांच्याकडे प्राथमिक शिक्षण. पुणे येथील वेदमूर्ती दिनकर फडके गुरूजी यांच्याकडे दशग्रंथासहित घनान्त अध्ययन पूर्ण केले.

श्रृंगेरी शारदा पीठम, अवधूत दत्त पीठम् म्हैसूर येथे आणि सहस्त्रबुद्धे समाधी मंदिर, पुणे येथे ऋमान्त व घनान्त परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण. सहस्त्रबुद्धे समाधी मंदिर येथे २०१६ साली ऐतिहासिक सामुहिक घनपारायण केले. पुणे येथे वेदपाठशाळेमध्ये ५ वर्षांपासून अध्यापनाचे कार्य करीत आहेत.

### २) यजुर्वेद :–



**वेदमूर्ती श्री. चिंतामणी बाळकृष्ण आंबेकर, नाशिक.**

**अध्ययन :–** वेद शास्त्र संपन्न कै. लक्ष्मीकांतशास्त्री दीक्षित यांच्याकडे यजुर्वेद संहिता व पारस्कर गुह्य सूत्राचे अध्ययन पूर्ण केले. वे. शा. सं. घनपाठी कै. एकनाथशास्त्री गर्गे यांच्याकडे पद, क्रम व त्या पुढील अध्ययन पूर्ण केले. तसेच नागपूर येथे वे. शा. सं. नानाशास्त्री मुळे यांच्याकडेही अध्ययन पूर्ण केले आहे.

**सन्मान :–** नाशिक येथील गंगा गोदावरी पुरोहित संघातर्फे घनपारायणात विशेष सहभाग होता. त्यात त्यांना 'वेदालंकार' पदवी देऊन गौरविण्यात आले. शुक्ल यजुर्वेद ब्राह्मण संस्थेने ''वैदिकरत्न'' पदवी देऊन गौरव केला आहे.

महाराष्ट्र, गुजराथ, प्रयाग व इंदौर, जयपूर, येथे झालेल्या वैदिक संमेलनात विशेष वैदिक म्हणून आमंत्रण होते.

**अध्ययन :–** नाशिक प्राच्य विद्यापिठात अनेक वर्षे अध्यापन करून असंख्य विद्यार्थी तयार केले आहेत. सध्या राहत्या घरीच ते अध्यापनाचे कार्य अविरत करीत आहेत.

### ३) अथर्ववेद :–



**श्री. विश्वास विलासराव मुळे, कळमनुरी, जि. हिंगोली.**


**अध्ययन :–** श्री चतुर्वेदेश्वर धाम सावरगाव येथे २००० ते २००८ पर्यंत वेदमूर्ती श्री. देशिक नारायणराव कस्तुरे गुरुजी यांच्याकडे संपूर्ण अथर्ववेद शाखा अध्ययन व ऋग्वेद पौरोहित्य शिक्षण पूर्ण केले. शाखा परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण.

* महर्षी सांदीपनी राष्ट्रीय वेद प्रतिष्ठान उज्जैन येथे परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण.
* वेदशास्त्रोतेजक सभा येथे अथर्व वेदभूषण परीक्षेत द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण.
* कालिदास रामटेक विश्वविद्यालय येथे परीक्षा उत्तीर्ण.
* दक्षिणामूर्ती वेदभवन गोकर्ण महाबळेश्वर येथे मुलसंहिता परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण.

**वेदपारायण व वेद स्वाहाकार :–** शंकरमठ माटुंगा येथे वेदपारायण, बेलगोळा म्हैसूर–कर्नाटक येथे वेद स्वाहाकार तसेच गोविंदपुरम, कुंभकोणम, कांचीपुरम, चेन्नई येथेही यात सहभाग.

**सन्मान –** कांचीपुरम येथील जयेंद्र सरस्वती यांच्या हस्ते सन्मान, ब्राह्मण मंडळ मुंबई यांच्यातर्फे सन्मान व सत्कार.

**४) सामवेद :– वेदमूर्ती श्री. अक्षय बाळासाहेब जोशी, औरंगाबाद**



**अध्ययन :–** सामवेद (राणायनी शाखा) सामवेद संहिता, पदपाठ, प्रकृतीगान, आरण्यकगान, उद्गान = रहस्य गान व अष्टब्राह्मण संपूर्ण.

वेदमूर्ती श्री कृष्ण मधुकर पळसकर गुरुजी (श्री समर्थ वेद विद्यालय, ढालेगाव) परभणी व वेदमूर्ती श्री. व्ही. गणेशन श्रौती गुरुजी तिरुपती – आंध्र प्रदेश यांच्याकडे वरील शिक्षण पूर्ण केले.

**परीक्षा –** श्री जगद्गुरू शंकराचार्य दक्षिणाम्नाय शारदापीठ श्रृंगेरी (कर्नाटक) येथे रहस्यान्त परीक्षा (घनान्तसम कक्ष) प्रथम श्रेणीत उत्तीर्ण (२००९)

* श्री अवधूत दत्त पीठम–म्हैसूर (कर्नाटक) रहस्यान्त परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण (२००९)
* श्री रामचंद्रापूर मठ होसनगर (कर्नाटक) सामवेद मूलान्त परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण. (२००७)
* वेदशास्त्र परिषद – राजमहेंद्री (आंध्र प्रदेश) रहस्यान्तम – परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण (२०१०)
* वेदशास्त्रोत्तेजक सभा पुणे – सामवेद कोविद परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण. (२००९)
* सद्गुरू दिगंबरदास महाराज मठ पुणे येथे सामवेद अभिज्ञ परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण (२००७)
* महर्षी वेद व्यास प्रतिष्ठान पुणे येथे सामवेद संपूर्ण परीक्षा प्रथम श्रेणीसहीत – सुवर्ण मुद्रिका प्राप्त (२००७)

**विशेष –** श्री दुर्गा वेदपाठशाळा नांदेड येथे तिरूपतीमधील सामवेद श्रौतस्मार्त विद्वान. व्ही. गणेशन गुरुजींसमोर संपूर्ण सामवेद रहस्यान्त पारायण कंठस्थपणे केले (२०१२)

**मिळालेल्या पद्व्या –** सामवेदाभिज्ञ, सामवेद कोविद, सामरहस्यज्ञ, वेदविभूषण, मेघावी छात्र पुरस्कार, युवा वैदिक पुरस्कार.


सध्या महर्षी सांदीपनी राष्ट्रीय वेदविद्या प्रतिष्ठान संचलित राष्ट्रीय आदर्श वेद विद्यालय उज्जैन (मध्य प्रदेश) येथे सामवेद राणायणी शाखेचे अध्यापन करीत आहेत.

---

**श्री. परशुराम नागरी सह. पतसंस्था मर्या. नाशिक** या संस्थेचा **२७ वा वर्धापन दिन** दि. १९/०३/२०२२ रोजी संस्थेमध्ये सर्व पदाधिकाऱ्यांच्या, कर्मचाऱ्यांच्या व उपस्थित ग्राहकांच्या उपस्थितीत कोरोनाच्या नियमांचे पालन करुन साजरा करण्यात आला.

संस्थेचे मुख्या प्रवर्तक श्री. विजय साने यांनी संस्थेच्या कार्याबद्दल व प्रगतीबद्दल संस्थेचे अभिनंदन केले. उपस्थित असलेले पदाधिकारी श्री. सुधीर दामले, श्री. अभय खरे, श्री. अनिरुद्ध अभ्यंकर, श्री. हेरंब घारपुरे, श्री. अमोल घुगे तसेच श्री. नितीन सहस्रबुद्धे या सर्वांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

तसेच गेल्या २५ वर्षापासून संस्थेचे पदाधिकारी असलेले श्री. अभय खरे, श्री. अभ्यंकर, सौ. मंगला जोगळेकर यांनी संस्थेसाठी दिलेल्या योगदानाबद्दल संस्थेच्या वतीने त्यांचे विशेष आभार मानण्यात आले.

।। श्री: ।।

महर्षि सांदीपनि राष्ट्रीय वेदविद्या प्रतिष्ठान, उज्जैन (शिक्षा मंत्रालय, भारत सरकार) द्वारा मान्यता प्राप्त

# वैदिक ज्ञान विज्ञान संस्कृत महाविद्यालय


**(गुरुकुल / वेदपाठशाळा)**

स्थापना : 1999


**789, उमामहेश्वर लेन, (जुने चित्तपावन मंगल कार्यालय) एकमुखी दत्तमंदिर परिसर, रविवार कारंजा,**
**नाशिक (महाराष्ट्र) 422 001 । फोन : 0253-2501107, +91 7219516167**
**ईमेल :** *vaidik.gurukul.info@gmail.com* **। वेब साईट :** *www.vaidik-gurukul.org*

**प्रधान संरक्षक : प. पू. जगद्गुरु शंकराचार्य श्री भारतीतीर्थ स्वामीजी दक्षिणाम्नाय श्रृंगेरी शारदा पीठम्**

## 23 वर्षांची यशस्वी परंपरा



**महर्षि**
वेद व्यास



**महर्षि योगीश्वर**
याज्ञवल्क्य



**आद्य**
शंकराचार्य



**वेद विद्यारण्य केसरी**
कै.नारायण देव गुरुजी



**वैदिक सम्राट**
कै.श्रीकृष्णशास्त्री गोडशे गुरुजी

**शुक्ल यजु:शाखीय वैदिक, याज्ञिक, पौरोहित्य शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यां करिता...**

## ✻ 2022 - 2023 साठी प्रवेश सुरू ✻

## प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य, प्रवेश मर्यादित..!!

**- निवासी पाच वर्षांचा 10वी समकक्ष वेदभूषण व सात वर्षांचा 12वी समकक्ष वेदविभूषण कोर्स -**

## (शासकीय मान्यताप्राप्त प्रमाणपत्र)

**- अटी -**

1) व्रतबंध झालेला असावा.
2) किमान इयत्ता 5वी उत्तीर्ण.
3) वय वर्षे 8 ते 15 पर्यंत.
4) किमान 7 वर्षे निवासी राहणे आवश्यक.
5) गुरुकुलाचे सर्व नियम पाळणे बंधनकारक.

**- वैशिष्ट्ये -**

1) सुसज्ज निवास, सात्विक भोजन, वैद्यकीय सुविधा, वस्त्र, अध्ययन साहित्य इ. सर्व व्यवस्था मोफत.
2) वेदाचार्य सलक्षण घनपाठी व दशग्रंथी वैदिक गुरुजनांकडून वेदशिक्षण.
3) संस्कृत, इंग्रजी, गणित, सामाजिकशास्त्र, संगणक, ज्योतिष, पौरोहित्य इ. विषयांचे तज्ञ गुरुजनांकडून शास्त्रोक्त अभ्यासक्रमाचे शिक्षण

**- विनीत -**

मुख्य विश्वस्त व प्राचार्य : श्री. स्मार्त चूडामणि घनपाठी पं. शांताराम मोहिनीराज भानोसे गुरुजी
उपप्राचार्य : श्री. वे. मू. घनपाठी पं. दिनेश रामचंद्र गायधनी गुरुजी । अध्यक्षा : सौ. अंजली शशी जाधव
कोषाध्यक्ष : श्री. मदन वल्लभदास देवी । उपाध्यक्ष : श्री. महेश भास्कर पैठणे । सचिव : श्री. पं. जयंत बापूराव जोशी
याज्ञिक अध्यापक : श्री. वे. मू. पं. तेजस जयंत जोशी । याज्ञिक अध्यापक : श्री. वे. मू. पं. विक्रम चिंतामणी आंबेकर
इंग्रजी / गणित अध्यापिका : सौ. कांचन विजय बेळे । सामाजिक विज्ञान अध्यापिका : सौ. सुनेत्रा मिथिलेश मांडवगणे

**- संपर्क -**

**संस्कृत अध्यापक : श्री. वे. मू. पं. प्रवीण प्रकाशराव जोशी : +91 98813 15122**
**वेद अध्यापक : श्री. वे. मू. घनपाठी पं. स्वप्नील सोमनाथ जोशी : +91 98811 82346**

*गेल्या दोन वर्षात लॉकडाऊनमुळे सर्वच जण पर्यटनास मुकले होते. परंतु आता वातावरण निवळत असल्याने पर्यटनाकडे सर्वांची ओढ वाढली आहे. आपल्या समाजाची मूळ गावे, कुलदैवत, कुलदेवता कोकणात असल्याने बरीच कुटुंबे कोकणात जातात. स्वत:च्या वाहनाने व्यवस्थित प्रवास व्हावा यासाठी ''सफर कोकणची : पर्यटन व कुलदैवते'' हा लेख आपण पुन्हा सुरू करीत आहोत.*

# सफर कोकणची : पर्यटन व कुलदैवते - लेखांक १

चित्तपावन, कोकणस्थांचा ओढा कायम कोकण भूमीकडे असतो. कारण मूळ पुरुष श्री परशुरामांनी निर्मिलेली, त्यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली निसर्गरम्य संपन्न अशी ही भूमी आहे. सर्व चित्तपावनांची कुलदैवते याच परिसरात आहेत. पूर्वी संपर्क व्यवस्था व स्थानिक सोई सुविधा कमी असल्याने काहीसा दुर्लक्षित असा हा परिसर. परंतु पर्यटन स्थळांचा दर्जा मिळाल्याने उत्तम रस्ते, न्याहारी, भोजन व निवासाची घरगुती तसेच पर्यटन महामंडळ व हॉटेल्सची चांगली सोय झाल्याने पर्यटकांची संख्या वाढली आहे. रुपेरी वाळूची किनारपट्टी, गरजणारा दर्या, लाल माती, कौलारू घरे, नारळ पोफळीच्या वाड्या, फणस, आंबा इत्यादी झाडांनी बहरलेले डोंगर, मध्येच करवंदांची झुडुपे अशा हिरवा गर्द असलेल्या संपूर्ण परिसरामुळे मनाला भुरळ न पडली तर नवलच. किहीम, अलिबाग पासून थेट रत्नागिरी पर्यंत जाणारे सागर किनारी रस्ते व नवीनच होऊ घातलेला किनाऱ्यावरील एक्स्प्रेस हायवे यामुळे गर्द हिरवाईतून फिरण्याचा मनमुराद आनंद व कुलदैवतांचे दर्शन याची सोय झाली आहे. मात्र यासाठी वेळ काढावाच लागेल ४/५ दिवसांचा.

निसर्गाबरोबरच ऐतिहासिक ठिकाणे जसे लेणी, गड, किल्ले, गुहा, बंदरे, दिपगृहे व श्रद्धास्थाने असलेली प्राचीन मंदिरे तसेच कोकणी लोकांचे जनजीवन व संस्कृती या गोष्टी देखील पाहता येतात. कोकण पर्यटनासाठी काळ वेळाचे बंधन नाही. आवडीनुसार कोणताही हंगाम निवडला तरी मनमुराद आनंद घेता येतो. सर्वात आल्हाददायक वातावरण, स्वच्छ मोकळे हवामान, स्थलांतरित पक्षांचे किनाऱ्यावरील विहंगम दर्शन यासाठी नोव्हेंबर ते फेब्रुवारी हा काळ सर्वात चांगला, मात्र काजू, आंबा, फणस, कोकम फळे, करवंद, ताडगोळे इ. कोकण मेव्याचा मनमुराद आनंद मिळतो शालेय सुट्ट्यांच्या काळात म्हणजेच मार्च ते जून या काळात. मात्र उष्ण दमट हवामानामुळे हमखास घाम येत असतो.

रौद्र निसर्ग रुप पाहण्यासाठी, जरा हटके मजा अनुभवण्यासाठी चांगला काळ – पर्जन्यकाळ – जून ते ऑक्टोबर. धो धो कोसळणारा पाऊस, रौद्र उसळत्या सागर लाटा, गडांवरील ट्रेकिंगचा धमाल अनुभव. मात्र एखाद्या ठिकाणी जाण्यापूर्वी परिस्थितीचा अंदाज घेऊनच जाणे उत्तम. अन्यथा ४/६ दिवस एकाच ठिकाणी अडकून पडावे लागेल. तसेच मत्स्याहारींना मासे मिळणे अवघड असते. एखाद्या वेगळ्या परिसरात गेल्यावर तेथील भोजनाचा पदार्थांचा आस्वाद जरूर घ्यावा. जसे सोलकढी, बिरड्यांची उसळ, मागणीनुसार उपलब्ध होणारे उकडीचे मोदक, पुरणपोळी, विविध प्रकारच्या फळांपासून निर्मिलेली अस्सल सरबते. मांसाहारींकरिता व मत्स्याहारींकरिता अस्सल कोकणी, मालवणी चवीचे, जसे कोंबडी वडे, माशांचे विविध प्रकार, लोणची इत्यादी प्रकार उपलब्ध असतात, अगदी चित्तपावनांच्या घरगुती मेस व हॉटेल्समधून. अन्यथा पंजाबी डिशेसही काही ठिकाणी उपलब्ध आहेत. मात्र साऊथ इंडियन प्रकार फारसे पाहण्यात आले नाहीत. या लेखन

## ❊ अभिनंदन ❊



आपल्या संस्थेचे सदस्य रघुनाथ गद्रे यांची कन्या **डॉक्टर नीरजा गद्रे** हिने नुकतेच दुर्गापूर येथील पॅरामेडिकल कॉलेज वेस्ट बंगाल हेल्थ युनिव्हर्सिटी कोलकाता येथून फिजिओथेरपी मध्ये ग्रॅज्युएशन पूर्ण केले. तसेच तिच्या महाविद्यालयात नीरजा पहिली आली आहे.

श्रृंखलेत किहिम ते रत्नागिरीपर्यंतची पर्यटन स्थळे, कुलदैवते, निवास व्यवस्था, संपर्क नावे व दूरध्वनी, भ्रमणध्वनी क्रमांक यांचा आढावा घेतला जाईल. संपूर्ण परिसरात डोंगर दऱ्या असल्याने सध्यातरी ७०% भागात बीएसएनएल भ्रमणध्वनी व ३०% परिसरात इतर भ्रमणध्वनी कार्य करतात. मात्र लॅण्डलाईन, पीसीओ सर्वत्र उपलब्ध असल्याने संपर्क व्यवस्था आहे. साधारणत: प्रत्येकी २५ ते ४० रुपयांपर्यंत नाष्टा व ६० ते १०० रुपयांपर्यंत भोजनाची सोय होते. राहण्याची व्यवस्था प्रत्येकी १५० ते २५० रुपये असते तसेच ४०० ते ७०० रुपयांपर्यंत ५ जणांसाठी अॅटॅच्ड खोली मिळते. अशा घरगुती व्यवस्थेव्यतिरिक्त तारांकनानुसार हॉटेल्स काही ठिकाणी उपलब्ध आहेत. जवळजवळ सर्वच ठिकाणी अगदी छोट्या गावातून चित्तपावनांकडे व्यवस्था आहे. तसेच मोठ्या देवस्थानांची भक्त निवास देखील आहेत. या सर्व व्यवस्थांचा परिसर निसर्गरम्य तर आहेच, शिवाय समुद्र किनारा १०० ते २०० मीटर्सवर, म्हणजेच केव्हाही समुद्र स्नानाची मजा लुटण्याची संधी.

आपल्या चित्तपावन संघाची अंबेजोगाई सहल तर झालीच. आता लवकरच नियोजन आहे ते कोकण सहलीचे. याची माहिती चित्तपावन मित्र मधून येईलच. अन्यथा चित्तपावन बंधूंनी २/३ कुटुंबियांचा ग्रुप करून अवश्य सहलीचा आनंद लुटावा.

नाशिकहून कल्याण, पनवेल, पेण मार्ग सोईचा आहे. पेणहून वडखळ नाका (कांदामाळा प्रसिद्ध) धरमतर खाडी पुलावरून अलिबागला येऊन उजवीकडे साधारणत: १५ कि.मी. वरील सासवाणे किहिमला जाता येते. किंवा खाडीपुलानंतर कार्लेखिंडीकडून मापगावकडे वळावे. मापगावात डोंगरावर श्री कनकेश्वराचे मंदिर आहे. साधारणत: ७५० बांधीव पायऱ्या चढून मंदिरापाशी येता येते. वाटेत डेरेदार वृक्षांभोवती बांधलेल्या पारावर विश्रांती घेता येते. श्री पालेश्वराचे मंदिर वाटेत आहे. जवळील गायमांडी भागात स्वच्छ व थंड पाण्याची सोय असल्याने थकवा दूर होतो. श्री कनकेश्वराचे मंदिर पांडवकालीन असून यास १३वे ज्योतिर्लिंग मानतात. देवस्थान जागृत आहे. शिवलिंगाच्या मुखवट्याखाली ५ लिंगे आहेत. बाहेर दिपमाळ आहे. वशिष्ठ गोत्रातील दाते, दात्ये घराण्यांचे हे कुलदैवत.

पुढील सासवणे गावात कै. विनायक पां. करमरकर यांचे शिल्पालय पाहण्यासारखे आहे. संग्रहालयातील स्वागतच त्यांच्या मोरू या विश्वासू नोकराच्या पुतळ्याने होते. विविध २०० शिल्पे संग्रहालयात पहावयास मिळतात. सन्मानाचे लॉर्ड मेयो पदकही त्यांना मिळाले. पुण्यात उभारलेला शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा हा त्यांचा भारतातील पहिला मानबिंदू ठरला. येथील समुद्र किनारा मात्र उथळ व खडकाळ आहे. पुढे लागते ते झाडीत लपलेले किहिम गाव. स्वच्छ सुंदर पण काहीसा खडकाळ असा समुद्र किनारा. किनारी वाऱ्यामुळे तयार झालेले छोटे वाळूचे पिरॅमिड दिसतात. किनारी ६/७ मीटर सात शिवलिंग आहेत. पुढे खोल पाण्यात नंदी आहे. किहिमला सर्व व्यवस्था आहे. परंतु काहीशी महाग, एमटीडीसी मान्यता प्राप्त. विजय भावे यांचा वक्रतुंड बंगला, उमेश दातार यांचे दातारवाडी हॉलिडे होम. सासवणे येथे रवी आपटे यांचे सागर दर्शन.

थळ गावात आल्यावर समुद्रात दिसतात ते खांदेरी व उंदेरी हे जलदुर्ग. पाऊण तासाच्या बोटीच्या प्रवासाने



किल्ल्यावर जाता येते. खांदेरी किल्ल्यात वेताळ मंदिर असून यास शार्क माशाचा पाठीचा कणा अर्पण करण्याची प्रथा आहे. तसेच एकाच मंदिरात गणपती व शंकराची मूर्ती आहे. इतरही मंदिरे, तोफा, तळी, कोठारे पाहण्यासारखी आहेत. १६७९ मध्ये शिवाजी महाराजांनी हा किल्ला बांधला.

खांदेरी किल्ला जिंकता न आल्याने जवळच्या उंदेरी बेटावर जंजिऱ्याच्या सिद्दी कासमने १६८० मध्ये हा किल्ला बांधला. किल्ल्यात तोफा व तीन तलाव असून चौथरे व पडक्या भिंती आहेत.

रस्त्याने जातांना चौकस नजर ठेवल्यास निसर्गातील आश्चर्ये पहावयास मिळतात. माडाला सहसा फांद्या नसतात मात्र वरसोली गावात एका माडाला ४/६ फांद्या फुटलेल्या दिसतात यास रावणमाड असे म्हणतात. दोन फांद्यांचे नारळाचे झाडही क्वचितच दिसते. पुढे आपण येतो अलिबागला. सरखेल कान्होजी आंग्रे यांचे हे गाव. त्यांनी कुलाबा किल्ल्याला आपले सत्ता केंद्र केले. हा ही किनाऱ्यापासून समुद्रामध्ये साधारणत: १ कि.मी. आत असलेला जलदुर्गच. बोटीने किल्ल्यात जाता येते किंवा ओहोटी असेल तर टांग्यातून किंवा चालतही जाता येते. कोणत्याही जलदुर्गाजवळ गेल्याशिवाय प्रवेशद्वार दिसत नाही, हे एक वैशिष्ट्य. १७ बुरुजांचा हा किल्ला आहे. उजव्या सोंडेच्या सिद्धिविनायकाची मूर्ती, शिवमूर्ती, सूर्यमूर्ती एकाच देवळात आहेत. बाहेर महिषासूर मर्दिनी व मारुती असे पंचायतन आहे. अलिबाग समुद्रकिनारा कायम गर्दीने फुललेला असतो. सुरक्षित वॉटर स्पोर्टस्ही येथे आहेत. इतर पाहण्यासारखी ठिकाणे म्हणजे – छत्रीबाग कान्होजी आंगरे आणि इतर २० स्मारक वृंदावने असलेला परिसर. भू–चुंबकिय वेधशाळा – १८२६ साली स्थापन झालेली जगातील दुसरी व भारतातील पहिली वेधशाळा. नॅनोटेसला व गॅमा या परिमाणात मोजल्या जाणाऱ्या भू–चुंबकिय शक्तिच्या गेल्या १०० वर्षातील नोंदी येथे उपलब्ध आहेत. विविध आकाराची चुंबके, छायाचित्रे पाहताना विज्ञानातील वेगळ्याच शाखेची ओळख होते. ६७ दशलक्ष वर्षांपूर्वीचा डायनासोरचा जिवाश्म देखील येथे आहे. जिज्ञासा ठेवून पर्यटन केल्यास ज्ञानकक्षा देखील रुंदावण्यास मदत होते. गावात हिराकोट हा सहा बुरुज व अभेद्य तटबंदी असलेला भुईकोट किल्ला आहे. मात्र बाहेरूनच पाहता येतो. याचे रुपांतर तुरुंगात केले आहे. अलिबागमध्ये मोहन कर्वे यांचे सागर लॉज आहे.

पुढे वाटेत असलेल्या नागाव गावात ९/१० प्रतिमांचे नागमंदिर आहे. सर्वात सुरक्षित सागर किनारा येथे आहे. किनारी दाट सुरुबन आहे. मऊशार वाळूवरुन मनसोक्त भटकंती करता येते. लहान मोठे प्रचंड खेकडे आहेत. आपण जवळ जाताच वाळूत बीळ करून गडप होतात. विविध रंगी आकाराचे शंख शिंपले कितीही गोळा केले तरी संपतच नाहीत. किनाऱ्यावर अनेक फांद्यांचा एक रावण माड ही आहे. गावात श्री विश्वनाथ मंदिर असून आतमध्ये उत्कृष्ट शिल्पकाम आहे. १७९० सालचे हे मंदिर आहे. बाहेरील पुष्करणीत लहान मोठी असंख्य कासवे आहेत. नागाव येथे घरगुती तसेच इतर सोई सुविधा चांगल्या आहेत. श्री. शिंत्रे यांची शिंगेवाडी, ज्योती काळे व ययाती शिंगे यांचे सागरसृष्टी बीच कॉटेज, अवधूत आठवले यांचे विश्रांती कॉटेल, अण्णाई कॉटेज – चंदू आपटे.

**(क्रमश:)**

– शब्दांकन व संकलन

**श्री. अनिरुद्ध अभ्यंकर**

## वसंत

फुल घेऊन हातात
डुलत हा चैत्र आला
पुन्हा गावेसे वाटते
धुंद कोकिळ पक्षाला
मधुशितल गोडवा
पानापानात भरला
जीव ओतून सृष्टीत
राजा वसंत हा आला

## चित्तपावन ब्राह्मण संघ - वधू यादी

| अ.क्र. | नाव पत्ता व फोन | जन्मतारीख | गोत्र | उंची | शिक्षण | मासिक उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|
| ९. | **कु. मिताली रविंद्र मराठे**<br>गुरुकृपा अपार्टमेंट, बापू बंगला, इंदिरानगर,<br>नाशिक - ४२२ ००९. मो. : ९९२३९८६८६३. | १६/०७/१९९३ | कपि | | M.Com | -- |
| १०. | **कु. कल्याणी विजय जोशी**<br>उत्कर्ष अपार्टमेंट, १ ला मजला, बोरुडे मळा,<br>बालिकाश्रम रोड, अहमदनगर - ४१४ ००१.<br>मो. : ९५५२०५२९०७. | २२/०९/१९८९ | वत्स | ५'.७'' | M.Com<br>PGDBM<br>MBS | १५,०००/- |

## चित्तपावन ब्राह्मण संघ - वर यादी

| अ.क्र. | नाव पत्ता व फोन | जन्मतारीख | गोत्र | उंची | शिक्षण | मासिक उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|
| २६. | **अजिंक्य मुकुंद जोशी**<br>९, गोदावरी हाईट्स, इंदिरानगर,<br>नाशिक - ४२२ ००९. मो. : ९४२३७८८६२५ | १३/०५/१९८९ | मांडव्य | ५'.११'' | B.E.<br>(CIVIL)<br>M.Tech | ३७,०००/- |
| २७. | **अनिरुद्ध श्रीराम गोडबोले**<br>फ्लॅट नं. ६, श्रेया अव्हेन्यू, इंदिरानगर,<br>नाशिक - ४२२ ००९. मो. : ९९२०५४२५८७. | २२/०५/१९८७ | कौशिक | ६'.६'' | MBA | १,३०,०००/-<br>मासिक |
| २८. | **ओमकार सुनिल जोशी**<br>१, नारायणी अपार्टमेंट, आनंदवन कॉलनी,<br>येवलेकर मळा, नाशिक - ४२२ ००५.<br>मो. : ८६९८९६५६६६. | १४/०१/१९९० | शांडिल्य | ५'.७'' | डिप्लोमा<br>(अपूर्ण) | ३०-४०,०००/- |





### हास्य तरंग

**आज्जींना एक फेक कॉल आला.**

**''तुमचे पॅन डिटेल्स पटकन सांगा''**

**आज्जी :-**

''निर्लेपचा आहे. डोसे छान होतात.
0.५ सेंटि मीटर जाडीचा आहे. हॅन्डल जरा ढिले आहे.
माझ्या सासूबाईंनी दिला होता.
आमचे हे पण फक्त या तव्यावरचाच
डोसा खायचे. पण आता ते नाहीत.''

***कॉल करणारा गप्पच***

### ❊ सामुहिक व्रतबंध ❊

**चित्तपावन ब्राह्मण संघ,** नाशिक संस्थेतर्फे सामुदायिक व्रतबंध सोहळा वैशाख शु. ४, शके १९४४, **गुरूवार, दि. ५ मे २०२२ रोजी, सकाळी ११.२६ वाजता** आयोजित करण्यात आता आहे. **व्रतबंध सोहळा संस्थेच्या काका गद्रे मंगल कार्यालयात, गोळे कॉलनी, नाशिक - ४२२ ००२** या ठिकाणी होईल.

**अधिक माहितीसाठी व नाव नोंदणीसाठी संस्थेच्या 'काका गद्रे मंगल कार्यालयात' कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा. सोय सर्वशाखीय ज्ञातीबांधवांसाठी आहे.**

**Mahalaxmi Tiffin Sercices**



**Why Eat Our Tiffin?**

Homely Food
Low on Spices & Oil
Nutritionally
Balanced Food

■ **Home Delivery is available**

**Tiffin Will Contain**

3 Chapati
1 Sabji
Salad
Pickle
Dal
Rice

**For Enquiry :**
+91 8007226086

**Address:** Raviwar Karanja & Indira Nagar, Nashik.

## ऋषभ संगीत

मेंडोलिन ह्या तंतुवाद्यावर शास्त्रीय, उपशास्त्रीय आणि सिने संगीत वाजवायला शिका !

**वय वर्षे १० ते ७०**

पुरुष व स्त्रियांसाठी वेगवेगळ्या बॅचेस.
एकमेव मेंडोलिन संगीत क्लास.

--- तसेच ---

आपल्याकडील सर्व कार्यक्रम मेंडोलिन वाद्य संगीतावर साजरे करा, स्वत: आनंद घ्या आणि इतरांना आनंद द्या !



* संपर्क *

**श्री. शरद जोशी**

(बी. ई. सिव्हिल आणि संगीत विशारद मेंडोलिन)
तसेच सिने मुझिशियन असोसिएशन,
मुंबईचे आजीव सभासद.
फोन : ९४२२७६९४९२



निवासी, व्यापारी, औद्योगिक संकुल बांधकाम, प्लॉट डेव्हलपमेंट यातील विश्वसनीय नाव

# मिहिर कन्स्ट्रक्शन


**सिव्हिल कॉन्ट्रॅक्टर**

**ऑफिस** : २, प्रसाद रेसिडेन्सी, माणेकशा नगर, रत्नपारखी हॉस्पिटलजवळ, द्वारका, नाशिक.
फोन : २५९०७५४

**सी. व्ही. रानडे,** बी.ई. (सिव्हिल)

**मोबाईल : ०९४२२२४६८७८**

आपल्याला दुसऱ्याचे बोलणे समजत नाही का?
होय....! तर आपल्या कानाच्या तपासणीसाठी...



**अदृश्य श्रवणयंत्र**

## एक उपयुक्त दागिना...!

अनेक नावाजलेल्या कंपन्यांचे श्रवणयंत्र उपलब्ध

**अनुभवी तज्ञांचे मार्गदर्शन**

मंडळाच्या आजीवन सभासदांसाठी **विशेष सुट**

**संपर्क : डॉ. श्री व सौ. वैद्य**
**संवाद स्पीच ॲण्ड हिअरिंग क्लिनिक**
फ्लॅट नं. १, पहिला मजला, प्रधान पार्क, एम.जी. रोड, नाशिक.
**Ph.: 2318333, Mob : 9422269394**

**शाखा :** हेरिटेज अपार्टमेंट, म्हसोबा मंदिराच्या समोर, VLCC जवळ, जेहान सर्कल, गंगापूर रोड, नाशिक

* अटी लागू

चित्तपावन महिला मंडळ

# ''स्नेहबंध मैत्रिणींचा''

शनिवार दिनांक २६ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता महिला मंडळाचा कार्यक्रम झाला. कोरोना काळात संस्थेचे सगळेच कार्यक्रम बंद होते. दोन वर्षांच्या कालावधी नंतर होणारा हा पहिलाच कार्यक्रम असल्याने उपस्थित मैत्रिणी उत्साहाने सहभागी झाल्या. ४२ मैत्रिणी उपस्थित होत्या. खूप दिवसांनी एकमेकींना भेटून सर्वांनाच खूप आनंद झाला.

या दिवशी तीन स्पर्धा घेण्यात अल्या. स्पर्धेचे आयोजन मैथिली गोखले यांनी केले. सूत्र संचालन मंगल जोगळेकर यांनी केले.

- पहिली स्पर्धा होती – ''एकाच रंगात रंगले मी''....
- दुसरी स्पर्धा होती – ''शब्दांवरून म्हणी ओळखा'' यात मैत्रिणींना शब्द लिहिलेल्या चिठ्ठ्या देण्यात आल्या. जो शब्द आला असेल तो वाचून म्हणून म्हणीत तो शब्द आला पाहिजे.
- तिसरी स्पर्धा होती – मोबाईलवर झटपट नंबर डायल करणे – यात अशा व्यक्तीला तुम्ही फोन लावायचा की त्याने पटकन वेळेत फोन कॉल रिसीव्ह करुन ''हॅलो'' म्हटले पाहिजे.

वरील सर्व स्पर्धांमध्ये मैत्रिणींनी अतिशय उत्साहाने सहभाग घेतला व खूप आनंद मिळवला.

- **''एकाच रंगात रंगले मी''.....**

या स्पर्धेसाठी मैत्रिणी एकाच रंगाचा पेहराव, दागिने, इतर वस्तू घेऊन नटून थटून आल्या होत्या. त्यात ७९ वर्षांच्या बर्वे आजींनी अगदी उत्साहाने भाग घेऊन बक्षीस मिळविले.

या स्पर्धेत – १) अर्पिता घारपुरे हिने सर्वाधिक नंबर्स मिळविले. त्यानंतर २) मीरा बर्वे ३) नेहा दिवेकर ४) स्मिता आपटे या सर्व मैत्रिणी विजयी झाल्या.

- **''शब्दांवरून म्हणी ओळखा''.....**

या स्पर्धेत गीता आगाशे, शिल्पा गोखले, स्मिता आपटे, निलिमा जोशी, कल्पना गद्रे, मेधा साठे, कालिंदी साने, आसावरी सहस्रबुद्धे, आशा पाटणकर, निलिमा दांडेकर, वैभवी लेले या मैत्रिणी विजयी ठरल्या.

- **मोबाईल रिंग स्पर्धा....**

यात गीता आगाशे, निलिमा दांडेकर, नेत्रा बढे, ऋचा साठे, कालिंदी साने, भक्ती भागवत या मैत्रिणी विजयी ठरल्या.

सर्व विजयी मैत्रिणींचे अभिनंदन !

स्पर्धा संपल्यावर लगेचच बक्षीस समारंभ झाला. आपल्यातील वयाने ज्येष्ठ अशा मीराताई बर्वे यांच्या हस्ते मैत्रिणींना बक्षिसे देण्यात आली. दरम्यान ३/४ मैत्रिणींनी उत्स्फूर्त असे मनोगत व्यक्त करून आनंद द्विगुणित केला.

सर्वच कार्यक्रम खूप उत्साहात पार पडला. शेवटी सगळ्यांना छोटासा अल्पोपहार देऊन कार्यक्रमाची सांगता झाली...

## ❋ भावपूर्ण श्रद्धांजली ❋



इंदिरानगर, नाशिक येथील रहिवासी व आपल्या संस्थेच्या आजीवन सभासद **सौ. यशश्री मुकुंद साठे** वयाच्या ६५ यांचे रविवार दिनांक ३ एप्रिल २०२२ रोजी राहत्या घरी अकस्मात निधन झाले. सौ. साठे यांनी सकाळ, गांवकरी आदी वृत्तपत्रांमधून पाककलेवरची सदरे चालवली होती. आकाशवाणी जळगाव आणि नाशिक या केंद्रांवर अनेक कार्यक्रमांमध्ये ही त्यांनी सहभाग घेतला होता. संस्थेतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.

## ❋ एप्रिल महिन्याचा कार्यक्रम ❋

- शुक्रवार दिनांक २२ एप्रिल रोजी महिला मंडळाचे ''चैत्रगौरीचे'' हळदीकुंकू करण्याचे ठरविले आहे. गद्रे मंगल कार्यालयात, सायं. साडेपाच ते सात वाजेपर्यंत कार्यक्रम होईल.
- संस्थेतर्फे आवाहन करण्यात येत आहे की.... प्रत्येक कुटुंबातील सर्व सदस्यांनी (स्त्री व पुरुष) चित्तपावन ब्राह्मण संघाचे सभासदत्व घ्यावे ही नम्र विंनती.

**– मंगला जोगळेकर**
**मैथिली गोखले**

# महिला मंडळाच्या २६ मार्च २०२२ रोजी झालेल्या कार्यक्रमांची क्षणचित्रे.

## मंडळाच्या ज्येष्ठ सदस्या सौ. मीराताई बर्वे यांच्या हस्ते बक्षीस वितरण



**मोबाईल रिंग स्पर्धा**
स्पर्धेतील विजयी स्पर्धक
भक्ती भागवत व ऋचा साठे



**शब्दांवरुन म्हणी ओळखा स्पर्धा**
स्पर्धेतील विजयी स्पर्धक
वैभवी लेले व आशा पाटणकर



आपले मनोगत व्यक्त करताना
सौ. अर्पिता घारपुरे, सौ. ऐश्वर्या साने,
सौ. सुनिता परांजपे, सौ. मंगला जोगळेकर



महिला मंडळातील आघाडीच्या सक्रिय कार्यकर्त्या
सौ. ऐश्वर्या साने, श्रीमती मैथिली गोखले,
अमृता वाड, मंगला जोगळेकर,
वासंती फाळके, सुनिता परांजपे




## 'सारखं काही तरी होतंय'

या नाटकाचा प्रयोग चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिकच्या सभासद आणि त्यांच्या कुटुंबियासाठी परशुराम जयंती निमित्ताने आयोजित केलेला आहे.

**ठिकाण**

कालिदास कला मंदिर, नाशिक.

**वेळ**

**सोमवार, दिनांक २ मे २०२२ रोजी, सायं. ५ वाजता**

(कार्यक्रम वेळेवर सुरू होईल)

सभासदांनी १५ मि. अगोदर स्थानापन्न व्हावे.

**नाटकाचे पासेस काका गद्रे मंगल कार्यालयात उपलब्ध.**

चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक या संस्थेच्या मालकीचा हा अंक संपादक व प्रकाशक श्री.विजय राजाराम साने, यांनी मीरा एंटरप्राईजेस, २, जयश्री अपार्टमेंट, ठाकरे बंगला, गंगापूर रोड, नाशिक– २ येथे छापून काका गद्रे मंगल कार्यालय, गोळे कॉलनी, नाशिक–४२२००२ येथे प्रसिद्ध केला.

**गद्रे मंगल कार्यालय, फोन : ०२५३ – २५७६२४१**

प्रति, ______________________

______________________

______________________

**संस्थेची वेबसाईट :–**

- Email ID : nasikchitpavan@gmail.com
- http://facebook.com/nasikchitpavan
- Website : www.nasikchitpavan.org
- http://twitter.com/nasikchitpavan
- http://youtube.com/user/nasikchitpavan

या मासिकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. लेखातील सर्व मते व विचार हे सर्वस्वी त्या त्या लेखकांचे आहेत. जाहिरातदारांनी जाहिरातीत केलेल्या निवेदनाला संपादक जबाबदार नाहीत. ग्राहकांनी जाहिरातीतील उत्पादनांची व नमूद केलेल्या बाबींची प्रत्यक्ष पडताळणी करून पाहावी. 'चित्तपावन मित्र' च्या मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादकांचा या गोष्टींशी काहीही संबंध नाही.

RNI - Regd No. 35688 / 20-11-1979
सवलतीच्या दराची तिकिटे लाऊन पोस्टाने पाठविण्याचा परवाना NSK / RNP-231/2021-2023
सदर अंक दर महिन्याच्या १० तारखेस प्रसिद्ध होऊन नाशिक G.P.O मधून वितरित केला जातो.